# <u>जनगणना २०११ -लातूर जिल्हा</u>

२०११ ही देशाच्या स्वातंत्र्यानंतरची ७ वी जनगणना असून यावेळी प्रथमच जनगणनेसोबत NPR (National Population Register) म्हणजेच राष्ट्रीय लोकसंख्या पंजी तयार करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. २००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्हयाची लोकसंख्या २०,८०,२८५ होती. १९८१ ते २००१ या कालावधीमध्ये लोकसख्या वाढीचा दर २४.०७ टक्के होती. ग्रामीण भागात १५,९०,००० (७६.४६ टक्के) व शहरी भागात ४,९०,००० (२३.५४ टक्के ) लोकसंख्या आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात ७१.५४ टक्के साक्षरता असून लोकसंख्येची घनता (प्रति चौरस कि.मि. मागे) २९० आहे.

१ मार्च, २०११ ही मानिव दिनांक मानुन जनगणनेचं काम १ मे २०१० पासून सुरू होत आहे. मागिल जनगणनेच्या तुलनेत या जनगणनेमध्ये काय बदल आहेत याची उत्सुकता प्रत्येक नागरिकांना असते. म्हणून जनगणनेच्या कामात अचुक आकडेवारी संकलित व्हावी म्हणून प्रत्येक नागरिकांने जनगणनेच्या कामासाठी येणा-या प्रगणकास आपल्या कुटुंबाविषयीची अचुक माहिती देवून या राष्ट्रीय कार्यास सहकार्य करणे अपेक्षित आहे.

जिल्हयाची जनगणनेच्या नियोजनाविषयीची संक्षिप्त माहिती

| | | |
|---|---|---|
| **१. महाराष्ट्र राज्य कोड-** | | २७ |
| **२. लातूर जिल्हा कोड-** | | २८ |
| **३. तालुक्याचे कोड-** | लातूर | ०००१ |
| | रेणापूर | ०००२ |
| | अहमदपूर | ०००३ |
| | जळकोट | ०००४ |
| | चाकूर | ०००५ |
| | शिरूर अ. पाळ | ०००६ |
| | औसा | ०००७ |
| | निलंगा | ०००८ |
| | देवणी | ०००९ |
| | उदगीर | ००१० |

**४.** अ. २००१ च्या जनगणनेनुसार गावांची संख्या- **९४५**

ब. २०११ च्या जनगणनेनुसार गावांची संख्या - ९४७

क. आजरोजी ग्रामपंचायतीची संख्या- ७८६

**५. घर यादी गटांची संख्या (House listing Blocks)**

अ. ग्रामीण- ३२१३

ब. शहरी- १०४४

क. एकुण- ४२५७

**६. आवश्यक प्रगणकांची संख्या-**

अ. ग्रामीण- ३५२४

ब. शहरी- ११२९

क. एकुण- ४६५३

**७. आवश्यक पर्यवेक्षकाची संख्या-**

अ. ग्रामीण- ५९१

ब. शहरी- २०५

क. एकुण- ७९६

**८. चार्ज अधिकारी (तहसिलदार / मुख्याधिकारी) यांचे प्रशिक्षण-**

अ. प्रथम प्रशिक्षण दि. १३ मार्च, २०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आले. स्वतः जिल्हाधिकारी यांनी उपस्थित राहून शहरी व ग्रामीण भागातील जनगणना गटाची संख्या निश्चीत करणे, गटाची प्रारूप नकाशा तयार करणे, २००१ व २०१० या कालावधीत कमी जास्त झालेल्या महसूली गांवाचा आढावा घेवून अचुक गांवाची संख्या निश्चीत करणे, गावनिहाय गट, प्रगणक, पर्यवेक्षक यांची संख्या निश्चीत करणे व जनगणना कायदा १९४८ अन्वये करावयाची सर्व कार्यवाही विषयी आढावा बैठक व विविध नमुन्यामध्ये प्रत्यक्ष माहिती संकलित करताना करावयाच्या कार्यवहीविषयी आढावा घेण्यात आला.

ब. दुसरे प्रशिक्षण दि. २४ मार्च, २०१० स्थळ जिल्हाधिकारी कार्यालय सहभागी प्रशिक्षणार्थी-सर्व तहसिलदार व मुख्याधिकारी, उपविभागीय अधिकारी व त्यांचे कर्मचारी इत्यांदीचा प्रशिक्षण मुंबई येथून आलेले जनगणना अधिका-याने दिवसभर दोन सत्रात प्रशिक्षण घेतले.

**९. जनगणना कामाची सुरूवात-**

संपुर्ण जिल्हयात एकाच वेळी म्हणजेच १ मे २०१० पासून प्रत्यक्ष जनगणनेच्या कामास सुरूवात होणार आहे. जनगणना ही दोन टप्प्यात होणार असून ते खालीलप्रमाणे

१. पहिला टप्पा - १ मे ते ३० सप्टेबर

अ. प्रगणक गटाचा नकाशा व घर यादी तयार करणे- १ मे ते १५ जुन अखेर

२. दुसरा टप्पा- ९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०११ प्रत्यक्ष जनगणना

**१०. लोकसंख्या रजिष्टर तयार करणे-**

यावेळी प्रथमच भारत सरकारने NPR म्हणजे National Population Register तयार करावयाचे काम हाती घेतलेला आहे. जनगणनेसोबतच याची कार्यवाही केली जाणार आहे. या कामाची सुरूवातही १ मे पासून होणार आहे. या रजिष्टरचे वैशिष्टये म्हणजे माननीय जनगणना आयुक्त व रजिष्टार जनरल आर्फ इंडीया यांच्या निर्देशानुसार ३५ कॉलमचा विहीत नमुन्यातील माहिती प्रगणकाद्वारे प्रत्यक्ष घरोघरी जावून माहिती संकलित केली जाणार आहे.

अ. यामध्ये कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे नांव, जन्म तारीख, लिंग, रहीवाश्याचा पत्ता, शैक्षणिक पात्रता, वैवाहिक स्थिती, आई-वडीलांचे नांव इत्यादी माहिती संकलित केली जाणार आहे.

ब. १५ वर्षावरील सर्व नागरिकांना फोटो ओळखपत्र व अंगटयाचा ठसा संगणकावर उमटविणार आहेत.

क. त्या ओळखपत्रास UNIQUE ID तसेच अंगटयाचा ठसा हा BIO-Metric Device वर नोंदविली जाणार आहेत.

ड. नागरिकांना याद्वारे विनंती करण्यात येते की, १ मे पासून आपल्या घरी जनगणनेच्या कामासाठी येणा-या कर्मचा-याला (ओळखपत्र धारण करणारा जिल्हाधिकारी नियुक्त अधिकृत कर्मचारी ) विहीत नमुन्यातील माहिती भरण्यासाठी आपल्या कुटुंबातील सदस्याविषयी माहिती देवून सहकार्य करावे.

इ. जनगणना व NPR हे राष्ट्रीय कार्य असून प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी अचुक माहिती देणं अपेक्षित आहे की जेणेकरून जनगणना झाल्यानंतर आपल्या जिल्हयातील आर्थिक सामाजिक विषयाची अचुक माहिती संकलित होईल.

फ. चुकीची माहिती देणा-या व्यक्तीवर दंडणिय कारवाई होवू शकते म्हणून प्रगणकांना प्रत्येक नागरिकांनी विहीत नमुन्यातील माहिती भरण्यासाठी खरी व अचुक माहिती देणे अपेक्षित आहे.

**११. प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण -**

प्रगणक हा प्रत्येक जनगणना गटासाठी नियुक्त केला जाणार असून साध:रणपणे १५० घरे किंवा ६०० लोकसंख्या हे प्रमाण मानून त्यासाठी १ प्रगणक नियुक्त केला जाणार आहे. व दर सहा प्रगणकामागे १ पर्यवेक्षकाची नियुक्ती केली जाणार आहे.

प्रगणकासाठी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षक व आवश्यक वाटल्यास इतर कर्मचा-यांचीसुध्दा नियुक्ती केली जाणार आहे. पर्यवेक्षकासाठी ग्रामसेवक, तलाठी व मुख्याध्यापक या संवर्गातील व्यक्तींची नियुक्ती करण्यात येणार आहे. एप्रिलच्या दुस-या किंवा तिस-या आठवडयात वरील सर्व कर्मचा-यांची नियुक्ती करून त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिलं जाणार आहे. ग्रामीण भागासाठी त्या-त्या तालुक्याचे तहसिलदार व नागरी भागासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेणार आहेत. प्रशिक्षणाचा कालावधी तिन दिवसाचा असून त्यापैकी पहिले दोन दिवस जनगणना कायदा १९४८ मधील घरयादी व कुटुंबपत्रक तयार करण्याविषयीचा आहे व तिसरा दिवस राष्ट्रीयत्वाचा कायदा १९५५ अन्वये करावयाच्या National Population Register विषयीचा आहे.

घरयादी कुटुंबपत्रकाची माहिती १ मे ते १५ जुन म्हणजे ४५ दिवसात पुर्ण करावयाचे असल्याने प्रत्येक कर्मचा-यांनी दररोज चार ते पाच घरांची माहिती संकलित केल्यास गणना गटातील १५० घरांची माहिती सहज संकलित होवू शकते. याकामात निष्काळजीपणा किंवा जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणे किंवा जनगणना कामात अडथळा आणणे किंवा खोटी माहिती देणे हे जणगणना कायद्याच्या कलम ८ नुसार गुन्हा आहे. म्हणून हे राष्ट्रीय कार्य असल्याने प्रत्येक कर्मचा-यांनी हे काम चोखपणे व दक्षतेने पुर्ण करणे अपेक्षित आहे व या कामास प्रत्येक नागरिकांनी अचुक माहिती देणे हे त्यांचे राष्ट्राच्या प्रती कर्तव्ये आहे. कारण या जनगणनेच्या कालावधी संकलित केलेल्या आकडेवारीवरूनच शासन विविध विकासाच्या योजना तयार करत असते. अचुक माहिती संकलित झाल्यास विकासाविषयीचं योग्य नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत मिळते. म्हणून याद्वारे जिलहा प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येते की, प्रत्येक नागरिकांनी आपल्या कुटुंबाविषयी अचुक माहिती देवून या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य करावे.

**(एकनाथ डवले)**
भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा**
**प्रधान जनगणना अधिकारी लातूर जिल्हा**